BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

ऊसतोडणी कामगारांचे हंगामी स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अध्ययन

वर्षा किसनराव चव्हाण

संशोधक विद्यार्थी

केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती

Demography, Migration and Social Transformation

Email : vnaik3034@gmail.com

सारांश (Abstract)

भारतीय समाजात स्थलांतर हे होत असते. व स्थलांतर ही लोकसंख्यात्मक, सामाजिक आणि आर्थिक बदलांशी निगडित प्रक्रिया आहे. म्हणून महाराष्ट्रातील ऊसतोडणी उद्योगासाठी दरवर्षी अनेक ग्रामीण कामगार हंगामी स्वरूपात स्थलांतर करतात. शेतीतील अनिश्चितता, स्थानिक रोजगाराच्या मर्यादा, आर्थिक गरजा, कर्ज आणि सामाजिक जाळे हे या स्थलांतराशी संबंधित घटक असू शकतात. ऊसतोडणीचे काम प्रामुख्याने श्रमप्रधान असून श्रमाला जास्त महत्त्व आहे. अनेक ठिकाणी पती-पत्नी किंवा कुटुंबातील सदस्य एकत्रितपणे काम करतात. स्थलांतरामुळे उत्पन्नाची संधी उपलब्ध होत असली तरी स्वच्छता,निवास,पाणी,मुलांचे शिक्षण,आरोग्य कामाच्या अटी आणि सामाजिक सुरक्षेचे प्रश्नही निर्माण होतात. प्रस्तुत लेखाचा उद्देश म्हणजे ऊसतोडणी कामगारांच्या हंगामी स्थलांतराची कारणे आणि त्याचे सामाजिक-आर्थिक परिणाम समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे हा आहे. हा लेख दुय्यम साहित्यावर आधारित वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे; प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षणाचे निष्कर्ष येथे मांडलेले नाहीत. म्हणजे प्रत्यक्ष सर्वेक्षण केलेले नाही आहे.स्थलांतराकडे केवळ कामगारांच्या हालचाली म्हणून न पाहता ग्रामीण विषमता, लिंगाधारित श्रमविभाजन, कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक परिवर्तनाशी जोडून पाहण्याची गरज लेखातून अधोरेखित केली आहे. स्थलांतराची गरज, रोजगाराचा प्रश्न, इत्यादी या लेखातून अधोरेखित करण्याची गरज वाटली.

की-वर्ड्स : ऊसतोडणी कामगार, हंगामी स्थलांतर, सामाजिक परिवर्तन, ग्रामीण अर्थव्यवस्था, कामगार कुटुंब, सामाजिक विषमता, स्थलांतर,बेरोजगारी, शहरी भागाचे आकर्षण, कुटुंब व्यवस्था.

1. प्रस्तावना

भारत हा खेड्याचा देश आहे. असे महात्मा गांधीजी विधान आहे. व शेती हा खेड्याचा प्रमुख भाग आहे. म्हणून भारतीय समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक रचनेत शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची उपजीविका शेती, शेतमजुरी आणि शेतीपूरक कामांवर अवलंबून असते. लघुउद्योग कुटीर उद्योग याचे प्रमाण खेड्यामध्ये जास्त असते.मात्र पावसाचे अनिश्चित स्वरूप, पाणीटंचाई, उत्पादन खर्चातील वाढ, लहान जमीनधारणा आणि स्थानिक रोजगाराच्या संधीमुळे रोजगार मिळणे अशक्य असते,यांमुळे वर्षभर स्थिर उत्पन्न मिळविणे अनेक कुटुंबांसाठी आव्हानात्मक ठरते. स्थिर उत्पन्नासाठी त्यांना शहराचा आधार घ्यावा लागतो. अशा परिस्थितीत हंगामी स्थलांतर हा उपजीविकेचा एक मार्ग बनतो.महाराष्ट्रात ऊस उत्पादन आणि साखर उद्योगाच्या हंगामी गरजांमुळे ऊसतोडणी कामगारांची मागणी निर्माण होते. विविध ग्रामीण भागांतील

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

कामगार काही महिन्यांसाठी कामाच्या ठिकाणी स्थलांतर करतात आणि हंगाम संपल्यानंतर मूळ गावी परततात. त्याला हंगामी स्थलांतर असे म्हणतात.या प्रक्रियेत रोजगार मिळविणे हा प्रमुख हेतू असला तरी स्थलांतराचा प्रभाव केवळ उत्पन्नापुरता मर्यादित राहत नाही. निवास, आरोग्य, शिक्षण, कौटुंबिक संबंध, सामाजिक सहभाग आणि जीवनशैली यांमध्येही बदल होऊ शकतात.

ऊसतोडणी हे श्रमप्रधान काम आहे. अनेकदा कामगारांची भरती मुकादम/मुकडदम किंवा मध्यस्थांद्वारे होते आणि काही ठिकाणी पती-पत्नी एकत्रित काम करतात. महिलांचे प्रत्यक्ष श्रम आणि घरगुती जबाबदाऱ्या एकाच वेळी सुरू राहू शकतात. मुलांचे स्थलांतर, शाळेतील सातत्य आणि सुरक्षितता हेही महत्त्वाचे प्रश्न ठरतात. मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न म्हणजेच की प्राथमिक शिक्षण त्यांना पाहिजे त्या काळामध्ये मिळत नाही. आणि नंतर हंगाम संपल्यानंतर ते मुलं आपल्या गावी गेल्यानंतर शाळा शिकण्यासाठी कंटाळा करतात, म्हणून त्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न ही खूप मोठी समस्या आहे. तसेच ऊस तोडणी कामगार ऊस तोडण्यासाठी जात असताना वृद्ध व्यक्तींचे प्रश्न हे सुद्धा खूप मोठी समस्या आहे कारण वृद्ध व्यक्तींना ते घरी सोडून जातात आणि त्यामुळे च्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. आणि घरामध्ये करता व्यक्ती नसल्यामुळे त्यांच्या आरोग्याचाच प्रश्न सुद्धा निर्माण होतो. आता मी उपचार केंद्र ग्रामीण भागामध्ये कमी प्रमाणामध्ये उपलब्ध असल्यामुळे त्यांना शहराचा आधार घ्यावा लागतो आणि त्यासाठी आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ते तात्पुरता उपचार करतात आणि त्यामुळे त्यांच्या आरोग्यांना धोका उद्भवतो. त्यामुळे ऊसतोडणी कामगारांचे स्थलांतर समजून घेण्यासाठी लोकसंख्या अभ्यासाबरोबरच ग्रामीण समाजशास्त्र, कामगार अभ्यास आणि स्त्रीवादी दृष्टिकोन आवश्यक ठरतात. यामध्ये ज्या अविवाहित आणि होतकरू मुली आहे त्यांचा विनयभंग यासारख्या समस्या उद्भवू शकतात. आणि ज्या परितक्त्या स्त्रिया आहे त्यांच्या संरक्षणाच्या सुद्धा समस्या निर्माण होऊ शकतात. कारण ऊसतोड कामगारांमध्ये जास्तीत जास्त व्यसनी व्यक्ती असतात त्यामुळे दिवसभर काम करून रात्री आपल्या कामाच्या ठिकाणी जात असताना ते व्यक्ती व्यसन करतात आणि त्यामध्ये त्यांना भान नसते त्यामुळे अशा प्रकारच्या वरील समस्या उद्भवतात.

भारतीय श्रमिकांच्या स्थलांतराचे स्वरूप

ऊस तोडणी मजूर कामानिमित्त पलायन करतात त्यावेळेस त्यांना तिथे पक्के घर राहत नाही.त्यामुळे ते रानात एखादी पाल वगैरे टाकून त्यांचा उदरनिर्वाह करतात तिथे अति थंडी पाणी या सर्व या सर्व स्वच्छता या सर्व गोष्टीमुळे त्यांच्या आरोग्यावर सुद्धा परिणाम होतो. व या सगळ्या गोष्टींचा सामना स्त्रियांना कळत नकळत सामना करावाच लागतो.कारण स्वयंपाक करणे त्यानंतर आंघोळ करणे लहान मुलांचे संगोपन करणे हे स्त्रियांना फार अवघड जाते.स्थलांतर या शब्दाचे दोन भिन्न अर्थ आहे स्थलांतराचा अर्थ म्हणजे आपले मूळ गाव किंवा ठिकाण सोडून जीवन जगण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहणे आणि असे करताना मूळ गावी वेळोवेळी परत येत राहणे. व परदेशामध्ये जे स्थलांतर होते त्यामध्ये आपले मूळ गाव सोडून दुसऱ्या गावी जातात परंतु परत येत नाही. याच ठिकाणी स्थायिक होतात.

भारतीय श्रमिकांच्या स्थलांतराची वैशिष्ट्य म्हणजे ती आपली मूळ जागा कायमची सोडत नाही. त्यांचे मूळ गावाशी असलेले संबंध कायम टिकून राहतात तुम्हा मध्ये तसेच गावामध्ये असलेला जिव्हाळा तसाच राहतो. भारतीय औद्योगिक क्षेत्रातील बहुतेक श्रमिक ग्रामीण भागातून येतात आणि ते औद्योगिक क्षेत्रात न राहता नियमितपणे आपल्या गावी परत जातात हे भारतीय श्रमिकांच्या स्थलांतराचे एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण आहे अशी माहिती देशातील भारतीय श्रमिकांच्या स्थलांतर करण्याच्या पद्धतीत फरक आहे. असे मत देशातील श्रमिक औद्योगिक क्षेत्रात कायमचे स्थायिक होतात आणि ते आपल्या मूळ गावे परत जात नाहीत त्यामुळे पाश्चिमाते देशांमध्ये स्थलांतराची ही पद्धती स्थायी स्वरूपाची आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

स्थलांतराचे प्रकार(types of migration)

१) दैनिक स्थलांतर (Daily migration)

या प्रकारात दररोज आपल्या गावाकडून शहरात कामासाठी येतात आणि काम झाल्यावर परत आपल्या गावी जातात.

२)मोसमी स्थलांतर(sessional migration)

हे स्थलांतर एका विशिष्ट हंगामात होतो आणि हंगामाचा कालावधी संपल्यावर हे स्थलांतर देखील थांबते उदाहरणार्थ शेतीची कामे (पेरणी, ऊस कापणी, ज्वारीकापणी इ.) झाल्यावर कामासाठी दुसऱ्या ठिकाणी जातात आणि काम झाल्यावर परत येतात.

३)आकस्मिक स्थलांतर (casual migration)

हे स्थलांतर अचानक उद्भवलेल्या कारणांमुळे करावे लागते.उदाहरणार्थ-सणअसेल,तेव्हा समारंभअसेल तेव्हा आजारपणामध्ये,धार्मिककार्यांमध्ये,आणि इतर काही विशिष्ट कारणे ही असू शकतात.

४)स्थायी स्थलांतर(permanent migration)

जेव्हा एखादा श्रमिक कायमचा नगरामध्ये स्थायित्व प्राप्त करतो तेव्हा त्या स्थायी स्थलांतर असे म्हणतात आधुनिक काळामध्ये आणि जागतिकीकरणा नंतर अशा प्रकारच्या स्थलांतराचे प्रकार अधिक प्रमाणामध्ये वाढले आहे.

५) स्थलांतराची कारणे:-(causes of migration)

"भारतीय श्रम करणाऱ्या व्यक्तींना शहर स्वतःकडे आकर्षित करीत नाही तर गावातील गावकरी त्यांना गावाबाहेर ढकलते."(कमिशन ऑन मायग्रेशन) या विधानानुसार अनेक अडचणींमुळे ग्रामीण भागातील श्रमिक शहरांकडे स्थलांतर करतात. उदा. गावामध्ये काम करण्याची साधने म्हणजेच की उपकरणे आणि गावामध्ये पाहिजे तसा रोजगार नसतो म्हणून गावातील लोक स्थलांतरण करतात खेड्या गावांमध्ये कामाची स्थिती अतिशय वाईट असते.

ग्रामीण भागातील स्थलांतरणांमुळे निर्माण झालेल्या अडचणी

१) शेतीत पुरेसे काम नसणे- त्यामुळे अनेक लोक शेतीवर अवलंबून राहतात परंतु शेतीतून मिळणारे अत्यल्प उत्पन्न त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह पूर्ण होत नाही म्हणून श्रमिकांची मागणी कमी झाली आहे त्यामुळे गावातील लोक शहराकडे स्थलांतर करतात.

२) कुटीर उद्योगाचा ऱ्हास-खेड्यातील लोक अनेक कोटी वृद्ध करतात व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात परंतु आधुनिक तंत्रज्ञान आणि वेगवेगळ्या यंत्राच्या आगमनामुळे या उद्योगांचा रास झाला आहे व ग्रामीण भागामध्ये विज, पाणी आणि इतर आवश्यक सोयी सुविधा नसल्यामुळे नोकरी मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना शहरांकडे जावे लागते.

३) नैसर्गिक आपत्ती-नैसर्गिक आपत्ती यामध्ये पूर, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामीण भागामध्ये श्रमिक रोजगार गमावतात यामुळे त्यांना उपजीविकेसाठी नगराकडे जावे लागते.१९६६ चा दुष्काळामुळे अनेक लोक हे कायमस्वरूपी नगरामध्ये स्थायिक झाले.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

४) ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा-ग्रामीण भागातील शेतकरी आणि इतर श्रमिक कर्जबाजारी असतात कर्जाच्या ऊर्जा खाली दबलेल्या असतात म्हणून नगराकडे अधिक कमाई करून कर्जाची परतफेड करू या आशेने ते नगराकडे स्थलांतर करतात.

५)सामाजिक दुर्व्यवहार-आजही ग्रामीण भागांमध्ये जातीनुसार भेदभाव केले जाते. व खेड्यामध्ये व्यक्तीला अपमानास्पद वागणूक मिळते परंतु नगरामध्ये मात्र अशा प्रकारचा भेदभाव केला जात नाही त्यामुळे त्यांना निसंकोच पणाने जगता येते. त्यामुळे अनेक लोक नगरामध्ये स्थलांतर करतात.

६) संयुक्त कुटुंबांचा ऱ्हास-अत्याधुनिक काळामध्ये आणि जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन झालेले आहे त्यामुळे लहान कुटुंबांच्या वाढत्या प्रमाणामध्ये अनेक कुटुंबे ग्रामीण भागातून शहरांमध्ये स्थलांतर आजही करतात.

स्थलांतराची गरज (is migratory tendency of workers desirable)

खेड्यांमध्ये गरिबी आणि मागासलेपणा यामुळे स्थलांतराची प्रवृत्ती ही आजही वाढत चाललेली आहे ही प्रवृत्ती कमी करण्यासाठी खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

श्रम चौकशी समिती अहवाल(labour investigation committee) या समितीच्या मते,"श्रमिक अनेक कारणांमुळे दहावी परत जातात उदा. कुटुंब नातेसंबंध सुरक्षिततेची भावना आणि कर्जाची परतफेड करण्यासाठी नगरांमध्ये त्यांना वेगवेगळ्या सुविधा आणि सुरक्षिततेचा अभाव असल्यामुळे श्रमिकांना परत गावी जावे लागते."

प्रो.राधाकमल मुखर्जी -"जागतिकीकरणामुळे आणि औद्योगिक कारणामुळे नगरामध्ये केंद्रित न करता खेड्या भागामध्ये किंवा ग्रामीण भागामध्ये लहान उद्योग आणि कारखाने सुरू केले पाहिजे यामुळे ग्रामीण भागातील श्रमिकांना काम करण्यासाठी शहरात जावे लागणार नाही खरंतर उद्योगांना कायमस्वरूपी आणि कुशल श्रमिक मिळणे आवश्यक आहे, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढेल परंतु, श्रमिकांच्या दृष्टीने पाहिल्यास, त्यांना आर्थिक सुरक्षितता, पुरेशी विश्रांती आणि गावाशी असलेले संबंध महत्त्वाचे वाटतात. त्यामुळे श्रमिकांची स्थलांतराची प्रवृत्ती पूर्णपणे थांबविणे शक्य नाही कारण नैसर्गिक आपत्ती, वृद्धावस्था, बेरोजगारी आणि इतर अनेक कारणांमुळे श्रमिक आपल्या गावामध्ये परत जातात व अशा आधुनिक युगातही श्रमिकांना आपल्या कुटुंबासोबत राहण्याची इच्छा असते, त्यामुळे त्यांना कायमस्वरूपी नगरामध्ये थांबविणे शक्य नाही."

औद्योगिक विकास आणि स्थलांतरण-

औद्योगिक वसाहत जशी जशी वाढत गेली तसतसे श्रमिकांच्या स्थलांतरही वाढली.मुंबई, पुणे, दिल्ली, जमशेदपूर यासारख्या ठिकाणी औद्योगिक शहरांमध्ये स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे.सुरुवातीच्या काळात श्रमिक आपल्या गावाशी असलेले संबंध टिकून ठेवत होते.परंतु आता शहरांमधील आकर्षण वाढल्यामुळे स्थलांतराची प्रवृत्ती वाढत आहे.

भविष्यातील स्थलांतर-आपल्या गरजा भागविण्यासाठी ग्रामीण भागातील व्यक्ती स्थलांतर करतात परंतु त्या स्थलांतर करताना त्यांच्या गरजा भागवत असताना त्यांना अनेक समस्या उद्भवतात जसे की त्यांचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा वेगळा असतो म्हणजे ही महत्त्वाची भावना त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असते. ज्या ठिकाणी स्थलांतर करून जातात त्या ठिकाणी स्थलांतराचा भाग म्हणजे की एका गावातून दुसऱ्या गावांमध्ये ते जातात म्हणजे की ते गाव शहराच्या जवळपास असते त्यामुळे त्या शहरातील आणि स्थलांतरित गावातील व्यक्तींचा त्या स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा वेगळ्या प्रकारचा असतो कारण. स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींपैकी काही व्यक्ती हे व्यसनाधीन असतात. व त्यामुळे त्यांना काही नुकसान होईल याचा विचार ते करतात आणि आपली सामाजिक प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करतात.आजच्या आधुनिक काळात श्रमिकांच्या राहणीमानात आणि जीवनशैलीमध्ये बऱ्याच प्रमाणात सुधारणा झाले आहे.अनेक नगरांमध्ये त्यांना चांगल्या सोयी

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

सुविधा मिळत आहे.त्यामुळे त्यांची गावाशी असलेले संबंध हळूहळू कमी होत आहे. आधुनिकीकरणामुळे आणि औद्योगिकीकरणामुळे औद्योगिक शहरे आणि उपकरणांचा विकास झाला आहे .ज्यामुळे औद्योगिकीकरण हे ऐतिहासिक सत्य बनले आहे.म्हणूनच श्रमिकांची स्थलांतराची प्रवृत्ती ही एक महत्त्वाचे ऐतिहासिक प्रक्रिया आहे.आधुनिक काळात श्रमिकांना सामाजिक सुरक्षितता मिळते आणि त्यांचे स्थलांतर देशाच्या विकासासाठी उपयोगी ठरू शकते.

2. संशोधन समस्येचे विधान

ऊस तोडणी कामगारांचे स्थलांतर हे स्थायी स्वरूपाचे नसून ते मोसमी स्वरूपाचे आहे म्हणजेच की हंगामी स्वरूपाचे आहे. म्हणून ऊसतोडणी कामगारांचे हंगामी स्थलांतर ग्रामीण उपजीविकेच्या गरजा आणि साखर उद्योगातील श्रममागणी यांच्यातील संबंधातून घडते. स्थलांतरामुळे रोजगार मिळण्याची संधी असली तरी कामगारांना अनिश्चित मजुरी, कामाच्या अटींबाबत अपुरी माहिती, तात्पुरता निवास, आरोग्यसेवेची मर्यादित उपलब्धता आणि सामाजिक संरक्षणातील अडथळे जाणवू शकतात. स्थलांतरामुळे कुटुंबातील भूमिका बदलतात; महिलांच्या श्रमाचे स्वरूप, मुलांचे शिक्षण आणि मूळ गावाशी असलेले संबंध यांवरही परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर स्थलांतराची कारणे, सामाजिक-आर्थिक परिणाम आणि सामाजिक परिवर्तनाशी असलेला संबंध समजून घेणे ही या अभ्यासाची मुख्य समस्या आहे. आणि काही स्त्रीवादी दृष्टिकोन सुद्धा यामध्ये दिसून येते.

3. संशोधनाची उद्दिष्टे

1. ऊसतोडणी कामगारांच्या हंगामी स्थलांतराची प्रमुख कारणे समजून घेणे.
2. ऊस तोडणी कामगाराच्या स्थलांतराचा सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.
3. ऊस तोडणी कामगाराच्या कुटुंबव्यवस्था, नातेसंबंध आणि कामाच्या भूमिकांमध्ये होणारे बदल स्पष्ट करणे.
4. महिला ऊस तोडणी कामगारांच्या श्रमस्थिती आणि लिंगाधारित जबाबदाऱ्यांचे विश्लेषण करणे.
5. स्थलांतरित ऊस तोडणी कामगारांच्या मुलांच्या शिक्षण, आरोग्य आणि संरक्षणाशी संबंधित प्रश्नांचा आढावा घेणे.
6. ऊस तोडणी कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी आणि जीवनमानासाठी उपाय सुचविणे.

4. संशोधन प्रश्न

1. ऊसतोडणी कामगारांच्या स्थलांतरामागे कोणते आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय घटक कार्यरत असतात?
2. हंगामी स्थलांतरामुळे कुटुंबांच्या उत्पन्न, खर्च आणि सामाजिक जीवनात कोणते बदल संभवतात?
3. महिलांच्या श्रमाचे स्वरूप आणि घरगुती जबाबदाऱ्यांवर स्थलांतराचा कसा प्रभाव पडतो?
4. मुलांचे शिक्षण आणि आरोग्य यांसाठी कोणती आव्हाने उद्भवतात?
5. स्थलांतरित कामगारांसाठी कोणत्या धोरणात्मक उपाययोजना उपयुक्त ठरू शकतात?

5. संशोधन पद्धती व मर्यादा

प्रस्तुत लेख वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचा असून दुय्यम माहितीवर आधारित आहे. स्थलांतरविषयक अधिकृत अहवाल, ऊसतोडणी कामगारांवरील प्रकाशित संशोधन, महिला कामगारांच्या परिस्थितीवरील अभ्यास आणि स्थलांतर व सामाजिक परिवर्तन यांवरील साहित्य या स्रोतांचा आधार घेऊन विषयाचे विश्लेषण केले आहे. माहितीचे वर्गीकरण स्थलांतराची कारणे, रोजगार, आर्थिक स्थिती, कुटुंब, लिंगभाव, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संरक्षण या घटकांनुसार केले आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

या लेखासाठी स्वतंत्र क्षेत्रीय सर्वेक्षण, प्रश्नावली किंवा मुलाखती घेण्यात आलेल्या नाहीत. म्हणून येथे नमुना आकार, टक्केवारी किंवा स्थानिक पातळीवरील प्रत्यक्ष निष्कर्ष दिलेले नाहीत. उपलब्ध साहित्याच्या निष्कर्षांचे संदर्भानुसार अर्थलक्षण करण्यात आले आहे. भविष्यातील अभ्यासासाठी विशिष्ट जिल्हा, मूळ गावे आणि कामाचे ठिकाण निश्चित करून प्राथमिक माहिती संकलित करता येईल.

6. हंगामी स्थलांतराचे स्वरूप

हंगामी स्थलांतर म्हणजे वर्षातील विशिष्ट काळात रोजगार किंवा उपजीविकेसाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे आणि परिस्थितीनुसार मूळ ठिकाणी परतणे. ऊसतोडणी कामगारांचे स्थलांतर साधारणपणे साखर उद्योगाच्या हंगामाशी संबंधित असते. काही कुटुंबे संपूर्ण कुटुंबासह जातात, तर काही मुलांना किंवा वृद्धांना मूळ गावी ठेवतात. स्थलांतराचे अंतर, वास्तव्याचा कालावधी, कामाचे स्वरूप आणि निवासाच्या सुविधा कुटुंबानुसार बदलतात.

या स्थलांतरात सामाजिक जाळ्यांची भूमिका महत्त्वाची असते. नातेवाईक, परिचित कामगार किंवा मुकादम यांच्या माध्यमातून कामाची माहिती मिळू शकते. एकदा निर्माण झालेले संपर्क पुढील हंगामातील स्थलांतर सुलभ करू शकतात. मात्र रोजगारासाठी काही मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागल्यास कामगारांच्या वाटाघाटीच्या क्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता असते. यामध्ये काही मुकादम हे फसवणूक सुद्धा करतात.

7. स्थलांतराची प्रमुख कारणे

7.1 शेतीतील अनिश्चितता-पावसावर अवलंबून असलेली शेती, पाणीटंचाई, उत्पादनातील चढउतार आणि वाढता खर्च यांमुळे कुटुंबांना पर्यायी उत्पन्नाची गरज भासू शकते. ऊसतोडणीचा हंगामी रोजगार अशा परिस्थितीत पूरक उत्पन्नाचा मार्ग ठरतो.

7.2 आर्थिक गरजा आणि कर्ज-घरखर्च, शिक्षण, आरोग्य, शेतीची गुंतवणूक आणि इतर कौटुंबिक जबाबदाऱ्या भागविण्यासाठी रोख उत्पन्न आवश्यक असते. काही कामगारांना हंगामापूर्वी आगाऊ रक्कम मिळते. ती तातडीच्या गरजा भागवू शकते; पण कराराच्या अटी अस्पष्ट असतील किंवा हिशेब पारदर्शक नसेल तर आर्थिक अवलंबित्व वाढू शकते.

7.3 स्थानिक रोजगाराच्या मर्यादा - वर्षभर नियमित काम न मिळणे, ग्रामीण उद्योगांचा अभाव आणि कौशल्याधारित संधींची कमतरता यामुळे स्थलांतराचा पर्याय निवडला जाऊ शकतो. भूमिहीन किंवा अल्पभूधारक कुटुंबांना ही मर्यादा अधिक तीव्रतेने जाणवू शकते.

7.4 सामाजिक जाळे आणि स्थलांतराची परंपरा- आधीपासून स्थलांतर करणारे नातेवाईक आणि गावातील परिचित व्यक्ती प्रवास, काम आणि वास्तव्याविषयी माहिती देऊ शकतात. काही कुटुंबांत स्थलांतराची पद्धत अनेक हंगामांपासून सुरू असते. त्यामुळे वैयक्तिक निर्णयासोबत सामाजिक संबंधही स्थलांतराच्या प्रक्रियेत सहभागी असतात.

7.5 पर्यावरणावर अवलंबून असलेली परिस्थिती- दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतीच्या उपजीविकेतील अस्थिरता स्थलांतराला हातभार लावू शकते. तथापि, प्रत्येक स्थलांतर केवळ पर्यावरणीय कारणामुळेच होते असे मानता येत नाही; आर्थिक आणि सामाजिक घटकही एकत्र कार्यरत असतात.

शहरी भागाचे आकर्षण-

१) **रोजगाराची संधी**-शहरामध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असतात वेगवेगळ्या प्रकारचे छोटे मोठे उद्योग व्यवसाय म्हणजेच की रिक्षा चालविणे छोटी छोटी दुकाने चालविणे त्यामुळे ग्रामीण भागातील लोक पैसे कमावतात आणि ग्रामीण

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भागातील लोकांना त्यांच्या पारंपारिक व्यवसायातून पुरेसे उत्पन्न मिळत नाही त्यामुळे ते रोजगाराची संधी शोधण्यासाठी नगरांमध्ये आकर्षित होतात.

२) सामाजिक समानता-नगरामध्ये लोकांना जाती धर्म किंवा सामाजिक दर्जापेक्षा त्यांच्या कामावरून ओळखले जाते त्यामुळे ग्रामीण भागातील भेदभावांपेक्षा शहरात अनेक समानता अनुभवता येते.

३) मनोरंजनाने चमचमणारे जीवनशैली-नगरामध्ये करमणुकीचे साधने (हॉटेल,बागा,सिनेमागृह) यासारख्या आकर्षणाचे केंद्र मोठ्या प्रमाणामध्ये उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील लोक शहराकडे आकर्षित होतात.

४) शिक्षण, आरोग्य आणि सोयी सुविधा-खेड्या भागामध्ये शिक्षणाच्या सोयी सुविधा कमी असतात आणि आरोग्याच्या सुद्धा सोयी सुविधा कमी असतात त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे आकर्षित होतात, कारण नगरामध्ये या सोयी सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध असतात.

8. सामाजिक-आर्थिक स्थिती आणि रोजगार

हंगामी रोजगारामुळे कामगारांना काही काळासाठी उत्पन्न मिळते. परंतु रोजगाराचा कालावधी मर्यादित असल्याने वर्षभराच्या खर्चाचे नियोजन महत्त्वाचे ठरते. कामाचे दिवस, मोबदल्याची पद्धत, प्रवासखर्च, अन्न, निवास, औषधोपचार आणि कर्जफेड यांमुळे प्रत्यक्ष उपलब्ध राहणाऱ्या उत्पन्नात फरक पडू शकतो. त्यामुळे एकूण मिळकत आणि निव्वळ आर्थिक लाभ यांमध्ये फरक ओळखणे आवश्यक आहे.

कामाच्या अटी, मजुरीची मोजणी, आगाऊ रक्कम आणि अंतिम हिशेब यांची स्पष्ट माहिती कामगारांना असणे गरजेचे आहे. लेखी करार, पावत्या आणि पारदर्शक नोंदींचा अभाव असल्यास वाद उद्भवू शकतात. कामगारांची सौदेबाजीची क्षमता, पर्यायी रोजगार आणि संघटनात्मक आधार यांचाही कामाच्या अटींवर प्रभाव पडतो.

सामाजिक स्थितीच्या दृष्टीने जमीनधारणा, शिक्षण, जात, वर्ग आणि सामाजिक संपर्क महत्त्वाचे ठरतात. स्थलांतरामुळे उत्पन्न मिळाले तरी सामाजिक प्रतिष्ठा किंवा निर्णयाधिकार आपोआप वाढेलच असे नाही. आर्थिक सक्षमीकरणाचे मूल्यांकन करताना उत्पन्नाची स्थिरता, बचत, कर्जाचे स्वरूप, मालमत्ता आणि संसाधनांवरील नियंत्रण यांचा विचार करावा लागतो.

9. कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक संबंधांतील बदल

स्थलांतरामुळे कुटुंबाच्या दैनंदिन जीवनाचे पुनर्नियोजन करावे लागते. तात्पुरत्या निवासात स्वयंपाक, पाणी आणणे, मुलांची काळजी आणि विश्रांतीची व्यवस्था नव्याने करावी लागू शकते. संपूर्ण कुटुंब स्थलांतरित झाल्यास सर्व सदस्यांना नवीन वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. काही सदस्य गावात राहिल्यास काळजीची जबाबदारी मागे राहिलेल्या नातेवाईकांवर येऊ शकते.

कामगार कुटुंबांचे मूळ गावाशी आर्थिक आणि भावनिक संबंध कायम राहतात. गावातील सण, सामाजिक कार्यक्रम, शेतीची कामे आणि नातेसंबंधांमध्ये सहभाग मर्यादित होऊ शकतो. स्थलांतरामुळे कुटुंबसंस्था नष्ट होते असे सरसकट म्हणता येत नाही; मात्र कुटुंबातील भूमिका आणि परस्परावलंबित्व बदलू शकते.

काही कुटुंबांमध्ये पती-पत्नीचे संयुक्त श्रम आणि उत्पन्नामुळे सहकार्य वाढू शकते. परंतु आर्थिक निर्णयांवरील अधिकार समान नसल्यास महिलांचे योगदान असूनही त्यांचा आवाज मर्यादित राहू शकतो. म्हणून कुटुंबातील परिवर्तन समजून घेण्यासाठी श्रमविभाजनाबरोबरच निर्णयप्रक्रिया आणि संसाधनांवरील नियंत्रणाचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

10. महिला कामगार आणि लिंगाधारित श्रमविभाजन

ऊसतोडणीच्या कामात महिलांचे योगदान महत्त्वाचे असते. अनेक ठिकाणी पती-पत्नी एकत्रितपणे काम करतात. प्रत्यक्ष मजुरीच्या कामासोबत महिलांना स्वयंपाक, पाणी आणणे, मुलांची देखभाल आणि इतर घरगुती कामे करावी लागू शकतात. त्यामुळे त्यांच्यावर वेतनित आणि अवैतनिक अशा दोन्ही प्रकारच्या श्रमांचा भार पडू शकतो.

महिलांच्या गरजांमध्ये सुरक्षित निवास, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, आरोग्यसेवा, मातृत्वविषयक सुविधा आणि तक्रार निवारण यांचा समावेश होतो. कामाच्या स्वरूपामुळे थकवा किंवा आरोग्यविषयक त्रास उद्भवल्यास उपचार मिळविण्याची उपलब्धता महत्त्वाची ठरते. महिलांचे श्रम कुटुंबाच्या उत्पन्नात योगदान देतात; तरी उत्पन्नावर नियंत्रण किंवा कामाच्या अटींबाबत निर्णयाधिकार त्यांना समान प्रमाणात मिळेलच असे नाही.

स्त्रीवादी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून महिलांच्या कामाचे सामाजिक मूल्य, लिंगाधारित श्रमविभाजन आणि घरगुती जबाबदाऱ्यांचे वाटप यांचे परीक्षण करता येते. महिला सक्षमीकरणासाठी रोजगाराबरोबर समान मोबदला, सुरक्षित कामाचे वातावरण, सामाजिक संरक्षण आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग आवश्यक आहे.

11. मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि संरक्षण

स्थलांतरित कुटुंबांच्या मुलांचे शिक्षण हे महत्त्वाचे सामाजिक आव्हान आहे. पालकांसोबत स्थलांतर करणाऱ्या मुलांना शाळा बदलणे, अभ्यासातील सातत्य, भाषिक अडचणी आणि प्रवेशाशी संबंधित प्रश्नांचा सामना करावा लागू शकतो. काही मुले मूळ गावी नातेवाईकांकडे राहतात; अशा वेळी संगोपन, भावनिक आधार आणि अभ्यासातील मदतीची गरज निर्माण होऊ शकते.

हंगामी स्थलांतरामुळे शिक्षणात खंड पडू नये यासाठी शाळांमधील समन्वय, शैक्षणिक नोंदींचे हस्तांतरण, स्थलांतरित मुलांसाठी पूरक शिक्षण आणि स्थानिक प्रशासनाची मदत महत्त्वाची आहे. मुलांना कामाच्या धोकादायक परिस्थितीपासून दूर ठेवणे आणि शिक्षणाचा अधिकार सुरक्षित करणे आवश्यक आहे.

आरोग्याच्या बाबतीत स्वच्छ पाणी, स्वच्छता, पोषण, लसीकरण आणि प्राथमिक आरोग्यसेवा या मूलभूत गरजा आहेत. तात्पुरत्या वस्तीतील सुविधा अपुऱ्या असल्यास कुटुंबांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. स्थलांतरित मुलांच्या संरक्षणासाठी शिक्षण, आरोग्य आणि बालकल्याण विभागांमध्ये समन्वय आवश्यक आहे.

12. समाजशास्त्रीय विश्लेषण

12.1 पुश-पुल दृष्टिकोन-मूळ प्रदेशातील प्रतिकूल परिस्थिती आणि गंतव्य प्रदेशातील उपलब्ध संधी या स्थलांतराच्या निर्णयावर परिणाम करतात. शेतीतील अनिश्चितता, स्थानिक रोजगाराचा अभाव आणि आर्थिक गरजा हे स्थलांतराला प्रवृत्त करणारे घटक असू शकतात; ऊसतोडणीच्या रोजगाराची मागणी आकर्षित करणारा घटक ठरू शकते. तरी स्थलांतराचे स्पष्टीकरण केवळ या दोन घटकांतून होत नाही.

12.2 संरचनात्मक विषमता-ग्रामीण भागातील संसाधनांचे असमान वितरण, जमीनधारणा, शिक्षण आणि रोजगारातील विषमता यांचा स्थलांतरावर परिणाम होतो. त्यामुळे स्थलांतर हा केवळ वैयक्तिक निवड नसून व्यापक आर्थिक-सामाजिक रचनेशी जोडलेला असतो.

12.3 स्त्रीवादी दृष्टिकोन-महिलांच्या वेतनित कामासोबत अवैतनिक घरकामाची जबाबदारी, श्रमाचे मूल्य, सुरक्षितता आणि निर्णयाधिकार यांचे परीक्षण करणे आवश्यक आहे. महिलांचे योगदान मान्य करणे आणि त्यांना सामाजिक संरक्षण देणे हे न्याय्य विकासाचे घटक आहेत.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

12.4 सामाजिक परिवर्तन- स्थलांतरामुळे नवीन सामाजिक संपर्क, अनुभव आणि अपेक्षा निर्माण होऊ शकतात. शिक्षण, जीवनशैली आणि सामाजिक जाणीव यांमध्ये बदल होण्याची शक्यता असते. परंतु असुरक्षित रोजगार, बहिष्करण आणि आर्थिक अवलंबित्व या संधींना मर्यादा घालू शकतात.

12.5 जीवनातील अस्थिरता-नेहमी होणारे स्थलांतरणांमुळे श्रम करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात अस्थिरता निर्माण होते त्यातून त्यांना उद्योगातून शेतीत किंवा पुन्हा शेतीतून उद्योगात जावे लागते त्यामुळे त्यांच्या जीवनात कोणत्याही गोष्टीची निश्चिती नसते.

12.6 आरोग्यावर दुष्परिणाम-नेहमी होणाऱ्या स्थलांतरणांमुळे श्रमिक लोकांना त्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होताना दिसतो.त्यांना पुरेशानी पौष्टिक अन्न मिळत नाही. कामाची जागा अस्वच्छ असते. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्यवस्थित नसते. कुटुंबापासून आणि आपल्या आप्तजनापासून दूर राहिल्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो.

12.7 कार्यक्षमतेत कमतरता-नेहमी होणाऱ्या स्थलांतरणामुळे श्रमिकांमध्ये कार्यक्षमता कमी होते आणि नवीन ठिकाणी काम शिकून त्यांना जुन्या ठिकाणी काम करायला वेळ लागतो ते पुन्हा गावी गेल्यामुळे त्यांचे कार्यक्षमता पूर्णपणे विकसित होऊ शकत नाही.

12.8 श्रमिक आणि मालकांमधील संबंधांचा अभाव-सतत स्थलांतर केल्यामुळे श्रमिक एका ठिकाणी तू जास्त काळ टिकत नाही त्यामुळे श्रमिक आणि मालकांमधील संबंध विकसित होत नाही त्यामुळे त्यांना त्यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित होत नाही.

12.9 नैतिक अध:पतन-नेहमी होणाऱ्या स्थलांतरामुळे श्रमिक कुटुंबा पासून दूर राहतात त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आधार मिळत नाही अशा परिस्थितीत जुगार,दारू, यासारख्या वेगवेगळ्या वाईट सवय त्यांना लागण्याची शक्यता असते त्यामुळे त्यांचे नैतिक अध:पतन होते.

13. विश्लेषणातून पुढे येणारे प्रमुख मुद्दे

दुय्यम साहित्याच्या संकल्पनात्मक विश्लेषणातून पुढील मुद्दे महत्त्वाचे दिसतात. प्रथम, ऊसतोडणी कामगारांचे स्थलांतर हे ग्रामीण उपजीविका आणि साखर उद्योगातील हंगामी श्रममागणी यांच्या संबंधातून घडते. दुसरे, स्थलांतरामुळे उत्पन्न मिळू शकते; मात्र उत्पन्नाची स्थिरता आणि सुरक्षितता निश्चित नसते. तिसरे, महिलांचे श्रम आणि घरगुती जबाबदाऱ्या एकत्रितपणे समजून घेणे आवश्यक आहे. चौथे, मुलांच्या शिक्षणातील सातत्य आणि आरोग्यसेवा ही स्थलांतरित कुटुंबांच्या कल्याणाची मध्यवर्ती बाब आहे. पाचवे, सामाजिक जाळे स्थलांतर सुलभ करत असले तरी काही मध्यस्थांवरील अवलंबित्व कामगारांच्या पर्यायांना मर्यादा घालू शकते. सहावे, कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करताना जात, वर्ग, लिंगभाव, वय आणि स्थलांतराचा कालावधी यांतील फरक लक्षात घेणे गरजेचे आहे.

हे मुद्दे लेखाच्या साहित्याधारित विश्लेषणातून मांडले आहेत. विशिष्ट प्रदेशातील कामगारांच्या अनुभवांची खात्री करण्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्रीय संशोधन आवश्यक आहे.

14. सूचना व उपाययोजना

1. ग्रामीण भागात वर्षभर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी कृषीपूरक उद्योग, कौशल्यविकास आणि स्थानिक रोजगार कार्यक्रमांना बळ द्यावे.
2. हंगामी कामगारांची सुलभ नोंदणी आणि रोजगारविषयक माहिती व्यवस्था विकसित करावी.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3. कामाच्या अटी, मोबदला, आगाऊ रक्कम, कपात आणि हिशेब याबाबत पारदर्शकता ठेवावी.
4. पात्र कामगारांना सामाजिक सुरक्षा, आरोग्यसेवा आणि अन्नसुरक्षा योजनांचा लाभ मिळण्यासाठी पोर्टेबल सुविधा व विभागीय समन्वय वाढवावा.
5. कामाच्या ठिकाणी सुरक्षित निवास, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
6. महिला कामगारांसाठी आरोग्य, मातृत्वविषयक सुविधा, सुरक्षितता आणि तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था असावी.
7. स्थलांतरित मुलांच्या शैक्षणिक सातत्यासाठी शाळांमध्ये समन्वय, प्रवेशसुलभता आणि पूरक शैक्षणिक मदत उपलब्ध करावी.
8. बालमजुरी रोखण्यासाठी आणि मुलांच्या संरक्षणासाठी स्थानिक प्रशासन, शाळा आणि बालकल्याण यंत्रणांमध्ये समन्वय साधावा.
9. कामगारांना कायदेशीर हक्कांची माहिती, संघटनात्मक प्रतिनिधित्व आणि तक्रार निवारणाची मदत मिळावी.
10. मूळ गावे आणि कामाच्या ठिकाणांवर आधारित नियमित अभ्यास करून पुराव्याधारित धोरणे आखावीत.

15. निष्कर्ष

ऊसतोडणी कामगारांचे हंगामी स्थलांतर ही महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संबंधित महत्त्वपूर्ण सामाजिक प्रक्रिया आहे. या स्थलांतरामुळे ग्रामीण कुटुंबांना काही काळासाठी रोजगाराची संधी मिळते; परंतु रोजगाराच्या हंगामी स्वरूपामुळे आर्थिक स्थैर्य, आरोग्य, निवास, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेचे प्रश्न कायम राहू शकतात.

स्थलांतरामुळे कुटुंबातील भूमिका, महिलांचे श्रम, मुलांचे शिक्षण आणि सामाजिक संबंध यांमध्ये बदल संभवतात. या बदलांचे स्वरूप सर्व कुटुंबांसाठी समान नसते. सामाजिक पार्श्वभूमी, उपलब्ध संसाधने, रोजगाराच्या अटी आणि स्थानिक सुविधा यांनुसार अनुभव बदलतात. म्हणून स्थलांतराला एकाच वेळी संधी आणि आव्हान या दोन्ही रूपांत समजणे आवश्यक आहे.

ऊसतोडणी कामगारांचा प्रश्न केवळ रोजगाराचा नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि समावेशक विकासाशी संबंधित आहे. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, कामगारांच्या हक्कांची अंमलबजावणी, सुरक्षित निवास, आरोग्यसेवा, मुलांचे शिक्षण आणि महिलांच्या संरक्षणासाठी एकात्मिक प्रयत्न आवश्यक आहेत. स्थलांतरित कामगारांना विकास प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटक म्हणून मान्यता देऊन त्यांच्या अनुभवांवर आधारित धोरणे आखल्यास अधिक समताधिष्ठित सामाजिक परिवर्तनाला चालना मिळू शकते.

संदर्भसूची (References)

1. International Institute for Population Sciences (IIPS), & UNICEF. (2022). Protection of children affected by seasonal migration: A study in Jalna district, Maharashtra.
2. International Organization for Migration. (2024). World Migration Report 2024. International Organization for Migration.
3. Shinde, S. (2020). The crucial highlights on sugarcane cutters in Maharashtra: Unorganized seasonal migrant laborers. International Journal of Humanities and Social Science Research, 6(1), 71–74.
4.Shinde, S. (2023). “Our poverty has no shame; the stomach has no shame, so we migrate seasonally”: Women sugarcane cutters from Maharashtra, India. CASTE: A Global Journal on Social Exclusion, 4(2), 437–445. https://doi.org/10.26812/caste.v4i2.604
5. Government of India. (2011). Census of India 2011: Migration tables. Office of the Registrar General & Census Commissioner, India.
6. ग्रामीण समुदायातील सामाजिक समस्या-डॉ.आशिष टेंभेकर. पृष्ठ क्रमांक ६७ ते ७२